जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १६१      दिनांक १५/०६/२०२१

# टेम्पोमध्ये गुटखा वाहतुक करीत असतांना दोन टेम्पोसह २ आरोपीतांना अटक

दिनांक १४/०६/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास मुंबई-अहमदाबाद हायवे रोड वरील वर्सोवा पोलीस चौकीचे समोर नाकाबंदी दरम्याण वाहनांची तपासणी करीत असतांना दोन टाटा कंपनीचे टेंम्पो हे एका मागोमाग येत असतांना पोलीसांनी पाहीले. सदर वाहनांना नाकाबंदी दरम्यान थांबविण्याचा इशारा केला असता ते पोलीसांकडे पाहुन पुन्हा यु टर्न घेवुन पळुन जाण्याचा प्रयत्न करु लागले त्यावेळी नाकाबंदी दरम्याण पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पळत जावुन सदरचे दोन्ही टेम्पोंना अडविले असता दोन्ही टेम्पोमध्ये मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला खालील नमुद वर्णनाचा व किंमतीचा प्रतिबंधीत 4 K गुटखा मिळुन आलेला आहे.

| अ.क्र. | मालाची किंमत | मिळुन आलेल्या मालाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १,६८,४८०/- रुपये | 4 K गुटख्याचे ०९ मोठे बोथ असुन, एका बोथमध्ये ०६ छोट्या गोण्या, एका छोट्या गोणीत 4 K गुटख्याचे ५२ पॅकेट, एका पॅकेटमध्ये 4 K गुटख्याच्या ६० पुड्या. (पॅकेटची प्रत्येकी किंमत ६० रुपये असुन सदरचा माल टाटा एस छोटा हत्ती वाहन क्रमांक MH 04 JU 8303 मध्ये मिळुन आला) |
| २ | २,६२,०८०/- रुपये | 4 K गुटख्याचे १४ मोठे बोथ असुन, एका बोथमध्ये ०६ छोट्या गोण्या, एका छोट्या गोणीत 4 K गुटख्याचे ५२ पॅकेट, एका पॅकेटमध्ये 4 K गुटख्याच्या ६० पुड्या. पॅकेटची प्रत्येकी किंमत ६० रुपये असुन सदरचा माल टाटा एस छोटा हत्ती वाहन क्रमांक MH 04 JU 7548 मध्ये मिळुन आला) |
| ३ | ३,००,०००/- रुपये | एक टाटा कंपनीची टाटा एस (छोटा हत्ती) टेंम्पो त्याचा क्रमांक MH **04 JU 8303** असा असुन त्याचा चेसीस नं.**MAT 445075 KYG16428** अशा वर्णनाचा. जुवाकिसु |
| ४ | ३,००,०००/- रुपये | एक टाटा कंपनीची टाटा एस (छोटा हत्ती) त्याचा वाहन क्रमांक **MH 04 JU 7548** असा असुन तिचे चेसीस नं. **MAT 445238KVF360228** अशा वर्णनाचा. जुवाकिसु |

वरील घटनेबाबत काशिमीरा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र. I ४३९/२०२१ भा. दं. वि. सं. कलम ३२८, १८८, २७२, २७३, ३४, सह अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ मधील कलम २६ (२) (**I**), कलम २६ (२) (**IV**) सहवाचन कलम ३(१) (**ZZ**) शिक्षा कलम ५९ तसेच कलम २६(२) (४) सह अन्नसुरक्षा आयुक्त यांचे दि. १५/०७/२०२० चे आदेश कलम २७(३)(ड) कलम २७(३) (ई) शिक्षा कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयात टाटा एस छोटा हत्ती वाहन क्रमांक MH 04-JU-8303 वरील चालक आरोपी नामे विनय विश्वनाथ सिंग, वय-२६ वर्षे, रा. रुम नं.०४, चाळ नं. ११, कळंबोली, ता. पनवेल. जि. रायगड तसेच टाटा

एस छोटा हत्ती वाहन क्रमांक MH 04-JU-7548 वरील चालक आरोपी नामे रामेश्वर रुस्तम शिंदे, वय-२८ वर्षे, रा. गेट नं.०१ मॉडर्न कंपनी, घोडबंदर गाव, ता.जि.ठाणे यांना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-०१, श्री. विलास सानप, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.संजय हजारे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन, सपोनि. महेंद्र भामरे, गणेश भामरे, पोउपनिरी. भाऊ ढुबे, पोहवा. राजु गायकवाड, पोना.बाळु घुगे, पोशि.५३४ बाळु आव्हाड, सचिन बर्डे, विनोद आवळे, रविंद्र कांबळे, होमगार्ड किशोर सावणे, होमगार्ड निलेश पवार, होमगार्ड गणेश बोढरे यांनी केली असून पुढिल तपास सपोनि. गणेश भामरे हे करीत आहे.

------ooooo-------